**परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय, मुंबई**

**प्रथम सत्रांत परीक्षा: २०२३-२४**

**इयत्ता: ६वी Std.6th** **गुण: ४०**

**विषय: मराठी (तृतीय भाषा) Marathi 3rd lang.** **वेळ: १.३० मि.**

---

प्रश्न १. खालील उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही ५) ५ गुण

सर्व जगाला मानव जातीच्या सेवेचा संदेश देणारे एक थोर विचारवंत म्हणजेच स्वामी विवेकानंद होय. स्वामी विवेकानंदांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. त्यांचे खरे नाव नरेंद्रनाथ होते. त्यांच्या मातेचे नाव भुवनेश्वरी देवी होते आणि पित्याचे नाव विश्वनाथ दत्त असे होते. विवेकानंद लहानपणापासूनच हुशार होते. त्यांची बुद्धी अतिशय तल्लख होती. स्वामी विवेकानंद एक चांगले वक्तेही होते. विवेकानंदांना अनेक भाषा येत होत्या. त्यांचे स्मारक कन्याकुमारी येथे उभारले गेले. स्वामी विवेकानंदांचा जन्मदिवस राष्ट्रीय युवक दिवस म्हणून साजरा केला जातो.

१. सर्व जगाला मानव जातीचा संदेश कोणी दिला?

१.महात्मा गांधी २.पंडित नेहरू ३.लोकमान्य टिळक ४.स्वामी विवेकानंद

२. विवेकानंदांच्या आईचे नाव काय होते?

१.कलादेवी २.पार्वती देवी ३.भुवनेश्वरी देवी ४.रमादेवी

३. विवेकानंदांचे बालपणीचे नाव काय होते?

१.नरेंद्रनाथ २.सुरेंद्रनाथ ३.विजेंद्रनाथ ४.राजेंद्रनाथ

४. विवेकानंदांची बुद्धी कशी होती?

१.चांगली २.तल्लख ३.कमजोर ४.साधारण

५. विवेकानंदांचे स्मारक कोठे उभारण्यात आले आहे?

१.द्वारका २.काशी ३.कन्याकुमारी ४.चेन्नई

६. स्वामी विवेकानंदांचा जन्मदिवस कोणता दिवस म्हणून साजरा केला जातो?

१.शिक्षक दिवस २.युवक दिवस ३.साक्षरता दिवस ४.वाचन दिवस

प्रश्न २. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही ६) ६ गुण

१. कुंदा ______ वर्षी पोहायला शिकली होती.

अ) सातव्या ब) आठव्या क) दहाव्या

२. आईचे पावसात _____ भिजले.

अ) साडया ब) पापड क) गहू

३. झाडे, शेती हिरवीगार _____ झाली होती.

अ) पावसामुळे ब) उन्हामुळे क) थंडीमुळे

४. चर्नीरोड उदयानात केळूस्कर गुरुजी _____ येत.

अ) वाचनासाठी ब) व्यायामासाठी क) खेळण्यासाठी

५. गावातल्या नदीचे नाव _____ होते.

अ) तापी ब) यमुना क) सोना

६. पैंजणचा आवाज _____ असा होतो.

अ) खडखड ब) झुळझुळ क) छुमछुम

७. शाळेला सुट्टी _____ यांनी दिली.

अ) कुट्टी मॅडम ब) शांती मॅडम क) पुट्टी मॅडम

प्रश्न.३ अ) एका वाक्यात उत्तरे द्या. (कोणतेही ४) ४ गुण

१. कुंदाने कोणाचा जीव वाचवला होता?

२. उद्यानात भेटलेल्या विद्यार्थ्याचे पूर्ण नाव सांगा.

३. मामाच्या मुलांची नावे सांगा.

४. विजा केव्हा चमकल्या ?

५. पाऊस आल्यामुळे आजोबांनी काय केले?

ब) कोण कोणास म्हणाले ते लिहा. (कोणतेही २) २ गुण

१. “बाळ, तुझं नाव काय?”

२. “कुंदा, आज तुझ्यामुळे माझ्या रझियाचा जीव वाचला”.

३. “मला ती पुस्तके वाचायला आवडतील” !

प्रश्न ४. अ) कवितेच्या ओळी पूर्ण करुन लिहा. २ गुण

१. पाऊस आला ! ....... .........
आम्ही केला ........ ...........

हसत म्हणाल्या ....... .........
‘..... .....’ शाळेला सुट्टी.

ब) खालील जोड़या लावा. २ गुण

| | | |
|---|---|---|
| i. आगगाडी | --- | अ. खडखड |
| ii. पैजण | --- | ब. झुकझुक |
| iii. बैलगाडी | ---. | क. खळखळ |
| iv. पाणी | --- | ड. छुमछुम |

क) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (वर्ण अंक बाराखडी) (कोणतेही ५) ५ गुण

१. अंक लिहा.
अ) बारा - ......... ब) पंचवीस - ..........

२. बाराखडी लिहा.
अ) प - ..........................................................................
ब) य - ..........................................................................

३. चार प्राण्यांची नावे लिहा.

४. पुढील शब्दात लपलेले शब्द लिहा.
अ) आवडतील - १) ................ २) ..............
ब) तुझ्याजवळ - १) .............. २) .............

५. ‘गाईचे हंबरणे’ तसे खालील पशुपक्ष्यांचे आवाजदर्शक शब्द लिहा.
अ) वाघ ब) बकरी

६. खालील सूचनेनुसार वेगळया शब्दांभोवती गोलाकार करा.
अ) वाघ, सिंह, गेंडा, घोडा
ब) गाय, गाढव, बकरी, जिराफ

प्रश्न. ५. अ) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (व्याकरण) १० गुण

१. समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही २)

अ) आई ब) नदी क) वारा

१. विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही २)

अ) आनंद ब) बाहेर क) हसणे

२. लिंग बदला. (कोणतेही २)

अ) मुलगा ब) मामी क) लेखक

३. वचन बदला. (कोणतेही २)

अ) पुस्तके ब) घर क) रस्ता

ब) सव्यय ओळखा. (कोणतेही २)

१) गणेश सायकल चालवतो. (नाम ओळखा)

२) राधा पेरू खाते. (नाम ओळखा)

३) त्याने पांढरा सदरा घातला. (सर्वनाम ओळखा)

४) ते फूल सुंदर आहे. (सर्वनाम ओळखा)

प्रश्न. ६. खालील दिलेल्या निबंधापैकी कोणताही एक निबंध लिहा. ४ गुण

अ) माझी आई ब) माझे घर